ISSN 2249-894X Impact Factor : 3.1402 (UIF) Volume - 5 | Issue - 10 | July - 2016

International Online Multidisciplinary Journal
Review of Research
ISSN No : 2249-894X
Impact Factor : 3.1402 (UIF) [2015]
Save Tree, Save Paper, Save World

Review Of Research

# वर्धा जिल्हयातील सिंचन अनुशेषची स्थिती व परिणाम : एकअध्ययन

प्रा. भास्कर जे. वाळके
लोक महाविद्यालय, जि. वर्धा.

**सारारशं**
प्रस्तुत अध्ययनातसंशोधकाने वर्धा जिल्हयातील सिंचन अनुशेषची स्थिती काय आहे? हे तपासण्याकरिता सर्वेक्षण पद्धतीचा वापर करून सिंचन अनुशेष निगडीत दस्तऐवजांचे अध्ययन केले. त्याचप्रमाणे वास्तविक स्थितीचे आकलन करण्याकरिता सिंचन विभाग व कार्याशी निगडीत सरकारी कर्मचारी, शासनाचे पदाधिकारी आणि सामाजिक कार्यकर्त्या कडून तसेच लाभार्थी नागरिक व शेतकऱ्यांकडून माहिती संकलित केली व त्या माहितीचे विश्लेषण करण्यात आले.



## प्रस्तावना

१ मे १९६० रोजी महाराष्ट्र राज्याची निर्मिती झाल्यानंतर पश्चिम महाराष्ट्र, कोकण, मराठवाडा आणि विदर्भ यांचा एकसमान विकास केला जाईल अशी अपेक्षा होती. परंतु प्रत्यक्षात तसे झाले नाही. दि. २८/०९/१९५३ च्या नागपूर करारात प्रदेशांच्या सर्वांगीण विकासाकरिता खास लक्ष पुरविण्यात येईल असे स्पष्ट होते. परंतु अनुशेष कमी झाल्याचे दिसून येत नाही. त्याचा परिणाम वर्धा जिल्हयातील कृषी उत्पन्न, उद्योग व रोजगारीवर होऊन विदर्भाच्या आर्थिक विकासात मोठा अडसर निर्माण झालेला आहे.

विदर्भामध्ये प्रामुख्याने कापूस, सोयबीन, गहू, भात, ज्वारी, संत्रा, केळी, मिरची, बाजरी, भाजीपाल्याचे पिक मोठ्या प्रमाणात होते. परंतु शेतीला होणारा पाणीपुरवठा नगण्य आहे. पावसांच्या पाण्यावरील कोरडवाहू शेती, दुहेरी पिकांचा अभाव यामुळे कृषी उत्पन्नात, उद्योगधंद्यात व रोजगारीत वाढ होऊन विदर्भाचा विकास वेगाने होण्यासाठी सिंचनाची गरज दिसून येते.

निर्देशांक व अनुशेष समितीने दि. ०१/०४/१९८४ रोजीचा सिंचन क्षेत्रातील जिल्हानिहाय अनुशेष निर्धारीत केलेला होता. त्यानुसार दि. ०१/०४/१९९४ रोजीचा सिंचन क्षेत्रातील आर्थिक

अनुशेष हा ७४१८ कोटी रुपये असा पुनर्गठीत करण्यात आला. मा. राज्यपाल यांनी सन २००१ पासून दिलेल्या निर्देशाद्वारे सदर आर्थिक अनुशेष दूर करण्यावर भर देण्यात आला. त्यामुळे सर्व जिल्ह्यातील भौतिक अनुशेष व त्याबरोबर आर्थिक अनुशेष दूर होणे अपेक्षित होते. परंतु चलनवाढ, बांधकामाच्या कालावधीत झालेली वाढ व किमतीत वाढझाल्याने भौतिक अनुशेष दूर करण्यात अपेक्षेप्रमाणे यश मिळाले नाही. आजही बरेचसे प्रकल्प अनुशेषांतर्गत रखडलेले आहे. निधीअभावी प्रकल्पाचे बांधकाम पूर्ण झाले नाही. त्यचा परिणाम म्हणजे कृषी लाभ क्षेत्रातील शेतकऱ्यांचा विकास झाला नाही. हा अनुशेष दूर करण्यासाठी सिंचन निर्मितीची प्रगती दरवर्षी सुमारे ५०००० हेक्टर इतकी वाढविणे गरजेचे आहे. त्यासाठी नियोजन करण्याची आवश्यकता आहे.

वर्धा जिल्हयातील सिंचन अनुशेष जर दिसून आला नसता तर जिल्ह्यातील मोठे, मध्यम व लघु सिंचन प्रकल्पाद्वारे शेतीला योग्य त्या वेळी, योग्य त्या प्रमाणात पाणी पुरवठा होऊ शकला असता. परिणामत: कृषी उत्पादन, अन्नधान्य, फळबाग, भाजीपाला, फुलबाग, कुकुटपालन, पशुसंवर्धन, मत्स्य व्यवसाय इत्यादी कृषी व कृषीवर आधारित उद्योगातील रोजगार वाढला असता. त्यामुळे लोकांचे दरडोई उत्पन्न वाढले असते. हे वाढलेले उत्पन्न ग्रामीण लोकांनी आरोग्य, शिक्षण, मनोरंजन, जीवनावश्यक गरजा याबरोबरच आधुनिक तंत्रज्ञान यावर खर्च केले असते. त्यामुळे पुन्हा वाहतूक, अधिकोषण, विमा इत्यादी सेवा क्षेत्राशिवाय इतरही सर्व क्षेत्रात रोजगार वाढत जाऊन दरडोई उत्पन्न वाढत गेले असते आणि पुन्हा पुन्हा "उत्पन्न-खर्च चक्रीय प्रवाह" सतत सुरू राहून विदर्भाचा आर्थिक विकास वेगाने झाला असता आणि विदर्भ सुजलाम-सुफलाम झाला असता असे फक्त सिंचन अनुशेषामुळे होऊ शकले नाही आणि म्हणूनच सदर संशोधनाची आवश्यकता आहे.

**सारणी क्रमांक १:सिंचन अनुशेषामुळेवर्धा जिल्हयातील कृषी उत्पादनावर अनुकूल अथवा प्रतिकूल परिणाम होण्यासंबंधी उत्तरदात्यांच्या प्रतिक्रीया**

| सिंचन अनुशेषामुळेवर्धा जिल्हयातील कृषी उत्पादनावर अनुकूल अथवा प्रतिकूल परिणाम | संख्या | टक्केवारी |
|---|---|---|
| टनुकूल | १२ | १२.० |
| प्रतिकूल | ५२ | ५२.० |
| सांगता येत नाही | ३६ | ३६.० |
| **एकूण** | १०० | १०० |
| **Chi-square** | **df** | **Sig.** |
| **24.322** | **2** | **<0.05** |

**Chi Square- काई वर्ग मूल्य; df- स्वातंत्र्यांश; Sig- सार्थकता**

वरील सारणी क्रमांक १ मध्ये सिंचन अनुशेषामुळेवर्धा जिल्हयातील कृषी उत्पादनावर अनुकूल अथवा प्रतिकूल परिणाम होण्यासंबंधी उत्तरदात्यांच्या प्रतिक्रीया दर्शविण्यात आल्या आहेत. सारणीत दर्शविलेल्या माहितीनूसार ५२.० टक्के उत्तरदात्यांच्या मते सिंचन अनुशेषामुळे वर्धा जिल्हयातील कृषी उत्पादनावरप्रतिकूल परिणामझाला असून, १२.० टक्के उत्तरदात्यांच्या मते सिंचन अनुशेषामुळे वर्धा जिल्हयातील कृषी उत्पादनावर अनुकूल परिणामझाला आहे. त्याचप्रमाणे सिंचन अनुशेषामुळे वर्धा जिल्हयातील कृषी उत्पादनावर अनुकूल अथवा प्रतिकूल परिणाम होण्यासंबंधी अनिश्चित असणाऱ्या उत्तरदात्यांची टक्केवारी ३६.० टक्के होती. सिंचन अनुशेषामुळे वर्धा जिल्हयातील कृषी उत्पादनावर अनुकूल अथवा प्रतिकूल परिणाम होण्यासंबंधी उत्तरदात्यांच्या प्रतिक्रीयांची तुलना केली असता सिंचन अनुशेषामुळे वर्धा जिल्हयातील कृषी उत्पादनावर प्रतिकूल परिणामझाला ही प्रतिक्रीया देणाऱ्या उत्तरदात्यांची संख्या सिंचन अनुशेषामुळे वर्धा जिल्हयातील कृषी उत्पादनावर अनुकूल परिणामझाला ही प्रतिक्रीया देणाऱ्या व अनिश्चित असणाऱ्या उत्तरदात्यांच्या तुलनेत महत्वपूर्णपणे (Chi Square – 24.322; df- 2: $P<0.05$) अधिक आहे. यावरून असे निदर्शनास येते की, सिंचन अनुशेषामुळे वर्धा जिल्हयातील कृषी उत्पादनावर प्रतिकूल परिणामझाला आहे.

**सारणी क्रमांक २:सिंचन अनुशेषामुळे कृषीवर आधारीत अनुषंगिक उद्योग व्यवसायातील रोजगार संधी यावर अनुकूल अथवा प्रतिकूल परिणाम होण्यासंबंधी उत्तरदात्यांच्या प्रतिक्रीया**

| सिंचन अनुशेषामुळे कृषीवर आधारीत अनुषंगिक उद्योग व्यवसायातील रोजगार संधी यावर अनुकूल अथवा प्रतिकूल परिणाम | संख्या | टक्केवारी |
|---|---|---|
| टनुकूल | ९ | ९.० |
| प्रतिकूल | ५६ | ५६.० |
| सांगता येत नाही | ३५ | ३५.० |
| **एकूण** | १०० | १०० |
| **Chi-square** | **df** | **Sig.** |
| **33.263** | **2** | **<0.05** |

**Chi Square- काई वर्ग मूल्य; df- स्वातंत्र्यांश; Sig- सार्थकता**

वरील सारणी क्रमांक २ मध्ये सिंचन अनुशेषामुळे कृषीवर आधारीत अनुषंगिक उद्योग व्यवसायातील रोजगार संधी यावर अनुकूल अथवा प्रतिकूल परिणाम होण्यासंबंधी उत्तरदात्यांच्या प्रतिक्रीया दर्शविण्यात आल्या आहेत. सारणीत दर्शविलेल्या माहितीनूसार ५६.० टक्के उत्तरदात्यांच्या मते सिंचन अनुशेषामुळे कृषीवर आधारीत अनुषंगिक उद्योग व्यवसायातील रोजगार संधी यावरप्रतिकूल परिणामझाला असून, ९.० टक्के उत्तरदात्यांच्या मते सिंचन अनुशेषामुळे कृषीवर आधारीत अनुषंगिक उद्योग व्यवसायातील रोजगार संधी यावर अनुकूल परिणामझाला आहे. त्याचप्रमाणे सिंचन अनुशेषामुळे कृषीवर आधारीत अनुषंगिक उद्योग व्यवसायातील रोजगार संधी यावर अनुकूल अथवा प्रतिकूल परिणाम होण्यासंबंधी अनिश्चित असणाऱ्या उत्तरदात्यांची टक्केवारी ३५.० टक्के होती. सिंचन अनुशेषामुळे कृषीवर आधारीत अनुषंगिक उद्योग व्यवसायातील रोजगार संधी यावर अनुकूल अथवा प्रतिकूल परिणाम होण्यासंबंधी उत्तरदात्यांच्या प्रतिक्रीयांची तुलना केली असता सिंचन अनुशेषामुळे कृषीवर आधारीत अनुषंगिक उद्योग व्यवसायातील रोजगार संधी यावर प्रतिकूल परिणामझाला ही प्रतिक्रीया देणाऱ्या उत्तरदात्यांची संख्या सिंचन अनुशेषामुळे कृषीवर आधारीत अनुषंगिक उद्योग व्यवसायातील रोजगार संधी यावर अनुकूल परिणामझाला ही प्रतिक्रीया देणाऱ्या व अनिश्चित असणाऱ्या उत्तरदात्यांच्या तुलनेत महत्वपूर्णपणे (Chi Square – 33.263; df- 2: $P<0.05$) अधिक आहे. यावरून असे निदर्शनास येते की, सिंचन अनुशेषामुळे कृषीवर आधारीत अनुषंगिक उद्योग व्यवसायातील रोजगार संधी यावर प्रतिकूल परिणामझाला आहे.

**सारणी क्रमांक ३:वर्धा जिल्हयातील नागरिकांच्या जीवनमानाचा स्तर उंचावण्यात सिंचन अनुशेष हा एक मुख्य अडथळा असण्यासंबंधी उत्तरदात्यांच्या प्रतिक्रीया**

| वर्धा जिल्हयातील नागरिकांच्या जीवनमानाचा स्तर उंचावण्यात सिंचन अनुशेष हा एक मुख्य अडथळा | संख्या | टक्केवारी |
|---|---|---|
| होय | ४२ | ४२.० |
| नाही | २७ | २७.० |
| सांगता येत नाही | ३१ | ३१.० |
| **एकूण** | १०० | १०० |
| **Chi-square** | **df** | **Sig.** |
| **3.62** | **2** | **NS** |

**Chi Square- काई वर्ग मूल्य; df- स्वातंत्र्यांश; Sig- सार्थकता**

वरील सारणी क्रमांक ३ मध्ये वर्धा जिल्हयातील नागरिकांच्या जीवनमानाचा स्तर उंचावण्यात सिंचन अनुशेष हा एक मुख्य अडथळा असण्यासंबंधी उत्तरदात्यांच्या प्रतिक्रीया दर्शविण्यात आल्या आहेत. सारणीत दर्शविलेल्या माहितीनूसार ४२.० टक्के उत्तरदात्यांच्या मते वर्धा जिल्हयातील नागरिकांच्या जीवनमानाचा स्तर उंचावण्यात सिंचन अनुशेष हा एक मुख्य अडथळा असून, २७.० टक्के उत्तरदात्यांच्या मते वर्धा जिल्हयातील नागरिकांच्या जीवनमानाचा स्तर उंचावण्यात सिंचन अनुशेष हा एक मुख्य अडथळा नाही. त्याचप्रमाणे वर्धा जिल्हयातील

नागरिकांच्या जीवनमानाचा स्तर उंचावण्यात सिंचन अनुशेष हा एक मुख्य अडथळा असण्यासंबंधी अनिश्चित असणाऱ्या उत्तरदात्यांची टक्केवारी ३१.० टक्के होती. वर्धा जिल्हयातील नागरिकांच्या जीवनमानाचा स्तर उंचावण्यात सिंचन अनुशेष हा एक मुख्य अडथळा असण्यासंबंधी उत्तरदात्यांच्या प्रतिक्रीयांची तुलना केली असता वर्धा जिल्हयातील नागरिकांच्या जीवनमानाचा स्तर उंचावण्यात सिंचन अनुशेष हा एक मुख्य अडथळा आहे ही प्रतिक्रीया देणाऱ्या उत्तरदात्यांची संख्या व वर्धा जिल्हयातील नागरिकांच्या जीवनमानाचा स्तर उंचावण्यात सिंचन अनुशेष हा एक मुख्य अडथळा नाही ही प्रतिक्रीया देणाऱ्या व अनिश्चित असणाऱ्या उत्तरदात्यांच्या तुलनेत महत्वपूर्ण (Chi Square – 3.62; df- 2: P<0.05) अंतर नाही. यावरून असे निदर्शनास येते की, वर्धा जिल्हयातील नागरिकांच्या जीवनमानाचा स्तर उंचावण्यात सिंचन अनुशेष हा एक मुख्य अडथळा असण्यासंबंधी अनिश्चितता आहे.

## निष्कर्ष

सिंचन अनुशेषामुळे वर्धा जिल्हयातील कृषी उत्पादनावर अनुकूल अथवा प्रतिकूल परिणाम होण्यासंबंधी उत्तरदात्यांच्या प्रतिक्रीयांची तुलना केली असता सिंचन अनुशेषामुळे वर्धा जिल्हयातील कृषी उत्पादनावर प्रतिकूल परिणाम झाला ही प्रतिक्रीया देणाऱ्या उत्तरदात्यांची संख्या सिंचन अनुशेषामुळे वर्धा जिल्हयातील कृषी उत्पादनावर अनुकूल परिणाम झाला ही प्रतिक्रीया देणाऱ्या व अनिश्चित असणाऱ्या उत्तरदात्यांच्या तुलनेत महत्वपूर्णपणे (Chi Square – 24.322; df- 2: P<0.05) अधिक आहे. यावरून असे निदर्शनास येते की, सिंचन अनुशेषामुळे वर्धा जिल्हयातीलकृषी उत्पादनावर प्रतिकूल परिणाम झाला आहे. त्याचप्रमाणे सारणी क्रमांक २ मधून प्राप्त परिणामावरून असे दिसून येते की, सिंचन अनुशेषामुळे कृषीवर आधारीत अनुषंगिक उद्योग व्यवसायातील रोजगार संधी यावर अनुकूल अथवा प्रतिकूल परिणाम होण्यासंबंधी उत्तरदात्यांच्या प्रतिक्रीयांची तुलना केली असता सिंचन अनुशेषामुळे कृषीवर आधारीत अनुषंगिक उद्योग व्यवसायातील रोजगार संधी यावर प्रतिकूल परिणाम झाला ही प्रतिक्रीया देणाऱ्या उत्तरदात्यांची संख्या सिंचन अनुशेषामुळे कृषीवर आधारीत अनुषंगिक उद्योग व्यवसायातील रोजगार संधी यावर अनुकूल परिणाम झाला ही प्रतिक्रीया देणाऱ्या व अनिश्चित असणाऱ्या उत्तरदात्यांच्या तुलनेत महत्वपूर्णपणे (Chi Square – 33.263; df- 2: P<0.05) अधिक आहे. यावरून असे निदर्शनास येते की, सिंचन अनुशेषामुळे कृषीवर आधारीत अनुषंगिक उद्योग व्यवसायातील रोजगार संधी यावर प्रतिकूल परिणाम झाला आहे.

## संदर्भग्रंथ सूची


१. आगलावे, प. (२०००), 'संशोधन पद्धती शास्त्र व तंत्रे' विद्या प्रकाशन नागपूर.
२. कवीमंडन विजय, (१९९२), भारताचा आर्थिक विकास आणि नियोजन, गणेश प्रकाशन, नागपूर.
३. कोलते पि. भि., (२००६), भारतीय जलसंस्कृती, स्वरूप आणि व्याप्ती, सुमेरू प्रकाशन, डोंबिवली.
४. गडकरी नितीन (२००३), सिंचन अनुशेषाचा संघर्ष, आस्वाद प्रकाशन, मुंबई.
५. घाटोले र. न.,(१९८९), 'समाजशास्त्रीय संशोधन पद्धती व तत्वे' मंगेश प्रकाशन नागपूर.
६. जोगळेकर स. आ., (१९५६), महासत्तासई, पुणे.
७. देशपांडे विनायक, भारतीय अर्थव्यवस्था, हिमालया.
८. पाटील टी.पी., (१९९८), महाराष्ट्राचा भूगोल, पिंपळापूरे पब्लिशर्स, नागपूर.
९. पाटील नरहर., (१९६९), अकोला जिल्हा परिचय ग्रंथ, अकोला.
१०.प्रादेशिक पाटबंधारे, (२००३), पाटबंधारे विभाग, प्रादेशिक अहवाल.
११. महाराष्ट्र शासन जलसचिन आयोग ७ डिसेंबर,१९६०.
१२. महाराष्ट्र शासन मुंबई (२०००–२००२) महाराष्ट्राची आर्थिक पाहणी, अर्थ व सांख्यिकीय संचालनालयनियोजन विभाग.
१३. महाराष्ट्र शासन (२००५), अनुशेष दूर करण्यासाठी: २००४–०५ च्या वार्षिक योजनेत केलेल्या विशेष, तरतुदी व ३१ मार्च २००४ अखेर झालेली भौगोलिक प्रगती दर्शविणारी पुस्तिका.

१४. महाराष्ट्र शासन (२००६), अनुशेष दूर करण्यासाठी : २००५-०६ च्या वार्षिक योजनेत केलेल्या विशेष, तरतूदी व ३१ मार्च २००५ अखेर झालेली भौतिक प्रगती दर्शविणारी पुस्तिका.

१५. विदर्भ वैधानिक विकास मंडळ नागपूर (२००१-०२), वर्धा जिल्हयातील विकासाचे महत्वाचे प्रश्न आणि उपाययोजना.

१६. वैद्य एन. बी., (२००३), विदर्भाची अर्थव्यवस्था मंगेश प्रकाशन, नागपूर.